**जिल्हाधिकारी ,वर्धा यांचे कार्यालय**
**महात्मा गांधी पुतळयाजवळ,सिव्हील लाईन्स,वर्धा**

दूरध्वनी क्र. (07152) 243446/ 240872 | वेबसाईट - www.wardha.nic.in
फॅक्स क्र. (07152) 240533 | ई-मेल - wardhardc@gmail.com

क्रमांक सहा.म.अ./गृह/कक्ष-3/कावि-829/2026 | दिनांक- 01 /09 /2026

**प्रति,**

1. सर्व विभाग प्रमुख
   --------------------
2. सर्व गटविकास अधिकारी
   पंचायत समिती ---------------

विषयः शासकीय व निमशासकीय कर्मचारी यांचे कुटुंबियांचे 100% आयुष्मान कार्ड निर्माण करणे बाबत.

संदर्भ: 1. मा. सचिव 2 सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पत्र क्र. PHD/37/2025-MJPJAY/AB-PMJAY दि.13.08.2025
2. राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे पत्र क्रमांक राआहसो/प्रजआयो/वकास/१०८४९/२०२५ दिनांक १०/११/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, एकत्रित आयुष्मान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शासकीय आणि निमशासकीय अधिकारी/कर्मचा-यांच्या कार्ड निर्माणाकरीता सुचना आहेत. त्यानुसार सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच त्यांचे कुटुंबीय हे सुद्धा राज्याच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुपये ५ लक्ष प्रती कुटुंब प्रतिवर्ष आरोग्य विषयक लाभ मिळण्यास पात्र आहेत. यासाठी सर्व शासकीय आणि निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे तसेच आप्तस्वकीयांचे आयुष्मान कार्ड तयार करून घ्यावे तसेच त्याबाबत कार्यालयाने आदेश निर्गमित करावेत.

सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांचे 100% आयुष्मान कार्ड निर्माण करणे करीता आपल्या स्तरावरून एक महिन्यात कार्यवाही करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा व काही अडचणी असल्यास खालील संपर्क क्रमांकावर संपर्क करावा.
श्री.बंटी श्रीवास आयुष्यमांन भारत मो.नं.8459267453
सहपत्र :- संदर्भ 2 ची प्रत

निवासी उपजिल्हाधिकारी,
वर्धा

प्रतीलीपी:- 1. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
2. जिल्हा चिकीत्सक,सामान्य रुग्णालय,वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
3. जिल्हा आरोग्य अधिकारी,वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

स्वा.
निवासी उपजिल्हाधिकारी,
वर्धा